# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. १७
# सभा क्र.२८, दिनांक ०४/०८/२०२३ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा (शुक्रवार, दि. २८/०७/२०२३ रोजीची) शुक्रवार, दि. ०४/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० (दहा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**कार्यपत्रिकेवरील विषय**

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.३७२**

पुणे महानगरपालिका क्षेत्रीय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरूड बावधन या क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे जुन२०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/३४०, दि. १९/७/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.३७३**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि. १/०७/२०२३ ते दि. १५/७/२०२३ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/३५४, दि. २४/०७/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.३७४**

दि. ०३/०७/२०२३ ते दि. ०९/०७/२०२३ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १९ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनीजा.क्र. मआ/अग्निशमन/३६४, दि. २५/७/२०२३ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सर्वातकमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र.३७५**

पुणे शहरातील कार्यकारी अभियंता क्र.२ यांचे कार्यक्षेत्रात जी–२० परिषदेच्या अनुषंगाने आवश्यक मुख्य रस्त्यावर पेंटिंग, थर्मोप्लास्टीक पेंट, साइन बोर्ड व तदनुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. देवगिरी एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वातकमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,५६,८८५/– पेक्षा ३८.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ५१,९२,५२७=३९ पर्यंत काम करून घेणेस, अधिक जीएसटी र.रू. १५,२२,२३९=३० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २०,७५५/– (असे एकूण र.रू. ६७,३५,५२१=६९) पर्यंत काम करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/३३८, दि. १९/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३७६**

मौजे महमंदवाडी दिल्ली पब्लिक स्कुलकडून हांडेवाडी चौकाकडे जाणारा रस्ता बांधणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. विठ्ठल एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे( टेंडर र.रू. १,८३,५९,४५८/– पेक्षा २१.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. १,४३,२२,२१३=१९ अधिक जीएसटी र.रू. २५,७७,९९८/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. २,७६,७१०/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. १५,५००/– अशी एकूण र.रू. १,७१,९२,४२१=१९ पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/३३९,दि. १९/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३७७**

पुणे शहरात जी–२० परिषदेच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता क्र.२ (पथ) कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील जंक्शन सुधारणा विषयक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. काशिनाथ सिताराम कुमावत यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,५६,२९७/– पेक्षा ३०.८० कमी )असल्याने त्यांचेकडून र.रू. ५८,५१,७५७=५२ पर्यंत काम करून घेणेस,अधिक

जीएसटी र.रू. १५,२२,१३३/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २०,७५५/– (असे एकूण र.रू. ७३,९४,६४५=५२) पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/३४१,दि. २०/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३७८**

मनपा प्राथमिक शाळा क्रमांक ९४ मुलांची कै. मामासाहेब मोहोळ प्राथमिक शाळा, कोथरूड शाळेत अभिनव शाळा (FUTURISTIC SCHOOL) अंतर्गत ३० विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सॉफ्टवेअर व हॉडवेयर असलेले डेस्क लॅन सिस्टिमसह तसेच प्रोग्रॅम लायसन्स फी व संपूर्ण ई सिलॅबस तसेच मुख्य पोडियम आवश्यक सुविधांसह पुरविणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एज्युफ्युचर टेक सोल्युशन्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ५०,००,०००/– पेक्षा ०.३९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४९,९८,०४५=७६ निविदा दर १८ टक्के जीएसटी व इतर करांसहित टेंडर अटी व शर्तीनुसार व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/प्रशासकीय अधिशि/३४४,दि. २१/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.३७९**

आरोग्य खाते किटक प्रतीबंधक विभागासाठी सायफ्ल्युथ्रीन १० % डब्लू.पी. (ISI MARK) पुरविणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी सर्वात लघुत्तम दर देणारे निविदाधारक मे. एस.के.सेल्स, पुणे यांचेकडून आरोग्य खाते किटक प्रतीबंधक विभागासाठी सायफ्ल्युथ्रीन १० % डब्लू.पी.औषधाची ९४० किलो खरेदी करणेसाठी र.रू. ४५,२५,५१९=२२ (सर्व करांसह) पर्यंत खरेदी करणेस त्यासाठी त्यांचेशी करारनामा करणेस व त्यापोटी होणारे बिल सन २०२२–२३RE17F13F या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/३४५,दि. २१/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८०**

पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील व परिसरातील पिण्याच्या जलनलिकांची देखभाल दुरूस्ती व इत्यादी तदनुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. शाहू कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ६३,५३,५२७/– पेक्षा३२.५७कमी )असल्याने त्यांचेकडून र.रू. ४२,८४,१८३=२५ अधिक १८% जीएसटीनुसार होणारी र.रू. ४,३५,४८१/– (कामगार वगळून) एकूण रक्कम रू. ४७,१९,६६४=२५ पैकी उपलब्ध आर्थिक र.रू. ३१,९०,०००/– तरतुदीच्या मर्यादेत काम करून घेणेसाठी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/३४६,दि. २१/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८१**

पुणे महानगरपालिका कॉलनी नं. ८ व ९ सी टी एस नं. १५५ + १५९ मधील इमारत क्र.'जे' घोरपडे पेठ या वसाहतीचे पुर्ननिर्माण करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. निखिल कन्स्ट्रक्शन ग्रुप प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. १८,६६,९६,६५४/–पेक्षा १.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. १८,३७,९३,५२१=०३ अधिक जीएसटी र.रू.३,३६,०५,३९८/– अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ३६,२४,७८५/–पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ४,४२,९५५/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट)सुत्राप्रमाणे व लेबर, मटेरिअल, पेट्रोल/डिझेलसाठी भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/३५३,दि. २४/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८२**

प्रभाग क्र.१० मध्ये व्हॉल्व्ह सोड बंद करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. गगनगिरी एंटरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ७४,९९,९००/–पेक्षा०.०० ॲटपार) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७४,९९,९००/– रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/३५५, दि. २४/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८३**

प्रभाग क्र. ३२ मध्ये व्हॉल्व्ह सोड बंद करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आराध्या असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ४९,९९,९३३/– पेक्षा ०.०० ॲटपार) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४९,९९,९३३/– रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/३५६, दि. २४/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८४**

प्रभाग क्र.१० मध्ये पाणीपुरवठा विषयक दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. गगनगिरी एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ४९,९९,९६०/– पेक्षा१८.७१कमी) असल्याने त्यांचेकडून

र.रू. ४०,६४,४६७=४८ रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/३५७,दि. २४/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८५**

प्रभाग क्र.२१ घोरपडी मुंढवा परिसरामध्ये जलवाहिन्यांची देखभालदुरूस्ती व तदनुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार सचिन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडरर.रू. ३१,१४,३०१/– पेक्षा २८.००० %कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. २२,४२,२९६=७२ अधिक १८% जीएसटी नुसार होणारी र.रू. २,७७,६३७/– ( कामगार वगळून ) एकूण रक्कम रू. २५,१९,९३३=७२ पर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/३५८,दि. २४/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८६**

पुणे शहरात जी–२० परिषदेच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता क्र.४ (पथ) कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावर पुर्नःडांबरीकरण विषयक व तदनुषंगिक कामे करणे (भाग–२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आदर्श भारत एन्व्हायरो प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ८४,४६,४२०/– पेक्षा २५.९५%कमी )असल्याने त्यांचेकडून र.रू. ६२,५४,५७४=०१ पर्यंत काम करून घेणेस, अधिक जीएसटी र.रू. १५,२०,३५६/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ३२,४९५/– (असे एकूण र.रू. ७८,०७,४२५=०१) पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/३५९,दि. २५/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८७**

परिमंडळ क्र. १, २ व ३ मधील विविध स्मशानभूमीतील गॅस दाहीनी करिता एल.पी.जी. गॅस सिलेंडरचा पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. SAI BHARAT GAS, SAI BHARAT GAS, Pune, Maharashtra, India, 411014 यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे( पूर्वगणन पत्रक र.रु. ४८,६०,३००/- मधील निविदा र.रु. ४८,६०,३००/- च्या ५.३१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४६,०२,२१८=०७ अधिक जीएसटी र.रू. ०.००/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ०/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ०.००/– पर्यंत अशी एकूण र.रू. ४६,०२,२१८=०७ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (११/०४/२०२३) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/३६०,दि. २५/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८८**

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. ४ व ५ मधील विविध गॅस दाहीणीसाठी एल.पी.जी. गॅसचा पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. SAI BHARAT GAS, SAI BHARAT GAS, Pune, Maharashtra, India, 411014 यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पूर्वगणनपत्रक र.रु. ४०,०२,६००/- मधील निविदा र.रु. ४०,०२,६००/- च्या ५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३८,०२,४७०/-अधिक जीएसटी र.रू. ०/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ०/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ०/– अशी एकूण र.रू. ३८,०२,४७०/– काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (०६/०४/२०२३) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/३६१,दि. २५/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३८९**

पुणे शहरातील व नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील विविध ठिकाणी (परिमंडळ क्र.२,५) उभारण्यात आलेल्या अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स व इतर जाहिरात फलक (होर्डिंग) क्रेनच्या साहाय्याने निष्कासित करणे इत्यादी कामे ठेकेदारामार्फत करून घेणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अविष्कार राजेंद्र घोलप यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ९९,९८,८५०/– पेक्षा– १०.८८०%बिलो) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८९,१०,९७५=१२० या रक्कमेचे काम करून घेणेस, त्यांच्याशी टेंडर अटी शर्तीनुसार करारनामा करणेस, कामाचे टेंडर मधील मान्य एबस्ट्रॅक्ट एस्टीमेटप्रमाणे बिल अदा करणेची प्रक्रिया करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/परवाना व आकाशचिन्ह/३६२,दि. २५/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३९०**

पुणे शहरातील व नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील विविध ठिकाणी (परिमंडळ क्र.१,३,४) उभारण्यात आलेल्या अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स व इतर जाहिरात फलक (होर्डिंग) क्रेनच्या साहाय्याने निष्कासित करणे इत्यादी कामे ठेकेदारामार्फत करून घेणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अविष्कार राजेंद्र घोलप यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ९९,९८,८५०/– पेक्षा – १.२००% बिलो) असल्याने त्यांचेकडून र.रू. ९८,७८,८६३=८०० या रक्कमेचे काम करून घेणेस, त्यांच्याशी

टेंडर अटी शर्तीनुसार करारनामा करणेस, कामाचे टेंडर मधील मान्य एबस्ट्रॅक्ट एस्टीमेटप्रमाणे बिल अदा करणेची प्रक्रिया करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/परवाना व आकाशचिन्ह/३६३,दि. २५/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**टेंडर्स न मागविता ५ (२) (२)अन्वये प्रकरणे**

**विषय क्र.३९१**

पुणे महानगरपालिकेतर्फे नगरसचिव कार्यालयामार्फत सद्यस्थितीस आयोजित करण्यात येणाऱ्या जयंती/पुण्यतिथी प्रसंगी आवश्यक असणाऱ्या पुष्पहार, पुष्पगुच्छ व फुलांच्या माळा पुरविणे कामी निविदा काढण्यात येते. नगरसचिव कार्यालयामार्फत आयोजित थोर व्यक्तींच्या जयंती/पुण्यतिथी कार्यक्रमप्रसंगी पुष्पहार, पुष्पगुच्छ, फुलांच्या माळा पुरविणे या कामाची निकड लक्षात घेवून निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत सन २०२२–२०२३ च्या मे. वेल्फेअर प्रोडक्शन या पात्र ठेकेदाराकडून १ एप्रिल २०२३ ते ३० जून २०२३ या दरम्यान नियोजित कार्यक्रमप्रसंगी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील शेडयुल डी चॅप्टर ५ मधील कलम (२) (२) व कलम १ (१)(ब) नुसार करारनामा करुन काम करुन घेणे व त्याप्रित्यर्थची संबंधितांची र. रु. २५०००/– (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस हजार फक्त) पर्यंतची बिले अदा करणेसाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

उपरोक्त कार्यक्रमांची निकड लक्षात घेवून निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र ५ नुसार सन २०२२–२०२३ च्या मे. वेल्फेअर प्रोडक्शन या पात्र ठेकेदाराकडून १ एप्रिल २०२३ ते ३० जून २०२३ पर्यंतच्या कार्यक्रमप्रसंगी **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील शेडयुल 'डी' चॅप्टर ५ मधील कलम २(२) व कलम १ (१)(ब) नुसार करारनामा करुन** पुष्पहार, पुष्पगुच्छ, फुलांच्या माळा पुरविणे हे काम करुन घेणेस व त्याप्रित्यर्थ त्यांची र. रु. २५०००/– (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस हजार फक्त) पर्यंतची बिले (जीएसटी सहीत) नगरसचिव कार्यालयाकडील खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून संबंधितांस अदा करणेस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नगरसचिव/३४९, दि. २४/७/२०२३ चे पत्र.

**सन २०२३ – २०२४ चे अंदाजपत्रक**

१. मुख्य देखरेख वसुली वगैरे,
क. महानगरपालिका व स्थायी समिती,
१. नगरसचिव यांचे कार्यालय, पान नं. ४० व १३९,

बजेटकोड–RE11A274/R1
र.रु. ३१,६०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एकतीस लाख साठ हजार फक्त)

बजेटकोड–RE11A123A
र.रु. ३,००,०००/–(अक्षरी रक्कम रुपये तीन लाख फक्त)

बजेटकोड–RE11A276/ R3
र.रु. १,५९,३५,०००/–(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणसाठ लाख पस्तीस हजार फक्त)

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र.३९२**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल विकसित करणे या प्रकल्पाअंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिटनोट निर्माण करणे याकरिता सॉफ्टवेअर बनविणे व डेव्हलपमेंट क्रेडिटनोटची छपाई तसेच अनुषंगिक प्रिंटर खरेदी करणे (बी–२ पद्धतीची) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. न्याती टेक्नोलॉजीस प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून र.रु. ८२,८४,७५४/– अधिक जी.एस.टी. पर्यंत अदा करणेस / करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इस्टेट) यांचेजा.क्र. मआ/पथ/६४३,दि. २३/९/२०२२ चे पत्र.

( टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. २१/६/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार २ महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र. ३९३**

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील वाहनतळांचे बाबतीत कोवीड–१९ या साथरोगाचे कालावधीतील वार्षिक मक्ता रकमेमध्ये काही प्रमाणात सवलत मान्य करणेबाबत मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. १२/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/प्रकल्प/८०७ दि.३/११/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

( टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. २१/६/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार २ महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र. ३९४**

पुणे शहराच्या हद्दीमधील रस्त्यांवर विविध सेवा वाहिन्या टाकणेसाठी शासकीय संस्थांना देण्यात येणारी सवलत रद्द करणे याकरिता खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/पथ/७११ दि.११/१०/२०२१ चे पत्र.

१. मा. मुख्य सभेने ठ.क्र. ७० दि. २२/६/२०१५अन्वये पारित केलेला ठराव निरस्त करणेस.

२. मे.एम.एन.जी.एल., महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळ व इतर सर्व शासकीय संस्थाना रस्ता पुर्नस्थापना दरामध्ये देण्यात येणारी सवलत रद्द करुन पुणे महानगरपालिकेमार्फत दरवर्षीच्या दरपत्रकानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे दर आकारणेस.

(टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. २१/६/2023 च्यासभेत ठरले होते.)
**निर्णय– सदर विषयाचा विचार २ महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३९५**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन /७१ दि. २०/५/२०२० चे पत्र.
( टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. २१/६/२०२३ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषय दफ्तरी दाखल करण्यात आला.**

**विषय क्र. ३९६**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.
( टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. २१/६/२०२३ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार २ महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३९७**

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सद्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरातवाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१००७ दि.२२/३/२०२१ चे पत्र.
( टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. २१/६/२०२३ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार २ महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र. ३९८**

भूमीगत केबलसाठी आकारणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/टिजीओ/४२२ दि.१०/८/२०२१ चे पत्र.
( टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. २१/६/२०२३ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार २ महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र. ३९९**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेशशुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेशशुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.
( टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. २१/६/२०२३ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार २ महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.४००**

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/ खाजगी/ सरकारी/ निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलितदर (र.रु.) | प्रस्तावितदर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

(टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. २१/६/२०२३ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार २ महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.४०१**

पुणे मनपाच्या पुणे पेठ बोपोडी नं. ४२/१,२,३ प्लॉट बी भाऊ पाटीलरोड, बोपोडी (आ. दत्ता वळसेपाटील रूग्णालय) येथील आय हेल्थकेअर या विभागासाठी वैद्यकीय उपकरणांची खरेदी करणे (टेंडर क्र.५ सन २०२३–२४) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे पात्र निविदाधारक अ.क्र. १) कोअर मेडिटेक यांचेकडून Oct with Angiography या उपकरणाची जीएसटी करासहित रक्कम रूपये – ९८,९९,९९८/– २) अप्पा स्वामी असोसिएट्स प्रा.लि. यांचेकडून Yellow Laser with accessories या उपकरणाची जीएसटी करासहित र.रू. १,००,८०,०००/– प्रमाणे या दोन उपकरणांची एकूण र. रू.

१,९९,७९,९९८/- पर्यंत पुणे मनपाच्या पुणे पेठ बोपोडी नं. ४२/१,२,३ प्लॉट बी भाऊ पाटीलरोड, बोपोडी (आ. दत्ता वळसे पाटील रूग्णालय) येथील आय हेल्थकेअर या विभागासाठी वैद्यकीय उपकरणांची खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांची बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२०७, दि. १३/६/२०२३ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२३-२४, RE17F133B उपकरणे यंत्रसामुग्री, पुणे शहरामध्ये हेल्थप्लॅन अंतर्गत रेफरन्स सेंटरमधील उपकरणे खरेदी व इतर खर्च, लॅप्रोस्कोप इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करणे, मान्य तरतूद रक्कम रूपये ५,००,००,०००/- + वर्गीकरणाद्वारे उपलब्ध होणारी आर्थिक तरतूद रक्कम रूपये - २,००,००,०००/-
( टीप- सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ६/७/२०२३ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय- सदर विषयाचा विचार २ महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.४०२**

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम सुधारणा २०२३ च्या निर्देशानुसार अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी चे महापालिका क्षेत्रात दर निश्चित करणे व त्यास मे.राज्य शासनाची मंजुरी घेणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अशाद/३२५, दि. १३/७/२०२३चे पत्र.
( टीप- सदर विषयाचा विचार १५ दिवसांनीकरावा असे दि. १४/७/२०२३ च्यासभेत ठरले होते. )
**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र.४०३**

भारतीय सेनेचेदक्षिण कमांड, पुणे यांचेकडील तिरंगा टनेल करण्याबाबतच्या प्रस्तावासाठी पुणे महानगरपालिकेकडून अर्थसहाय्य देणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पर्यावरण/३४३, दि.२०/७/२०२३ चे पत्र.

पुणे महानगरपालिका व भारतीय सेनेचे सदर्न कमांड मुख्यालय यांचे एकत्रित प्रयत्नांतून शहरासाठी राष्ट्रध्वजाच्या रंगावर आधारित कौन्सिल हॉलशेजारील पुणे कॅन्टोन्मेंटच्या हद्दीतील दक्षिण कमांड मुख्यालयासमोरील रस्त्यावर तिरंगा टनेल फुलांची कमान बांधणेसाठी त्यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार पुणे महानगरपालिकेकडून र.रू. ८.०० लक्ष 'Society for Environment and Biodiversity Conservation ' यांचे नांवे चेक अदा करणेस.
**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.४०४**

पॅरा टार्गेट शुटींग असोसिएशन, पुणे आयोजित तिसरी पुणे पॅरा जिल्हास्तरीय नेमबाजी स्पर्धा २०२३-२४ या स्पर्धेचे आयोजन दि.१६/०८/२०२३ ते दि.२१/८/२०२३ या कालावधीत करणेस व स्पर्धेच्या आयोजनासाठी २०२३-२४ च्या समाज विकास विभागाकडील FE14E128 या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकामधून पॅरा टार्गेट शुटींग असोसिएशन, पुणे या संस्थेस र.रू. ९,०१,५९०/-पर्यंत अर्थसहाय्य देणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/क्रीडा/३४७, दि.२१/७/२०२३ चे पत्र.
**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.४०५**

स.नं. ८, यशवंतनगर एअरपोर्ट रोड, येरवडा, पुणे येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन या ठिकाणी पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग व आद्य क्रांतीवीर लहुजी साळवे युवक संघ, स.नं. ८, यशवंतनगर एअरपोर्ट रोड, येरवडा, पुणे ४११००६ या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उपक्रम राबविणेकरीता मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील अ.क्र. १ ते ११ बाबींस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र. मआ/सविवि/३५२, दि. २४/७/२०२३ चे पत्र.
**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही /- xxx**
**(योगिता भोसले)**
**प्र. नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**सही /- xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**